# सेवा भरती / पदोन्नती

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम 1967 नुसार सरळ सेवा प्रवेशाने भरती व वरिष्ठ पदावरील पदोन्नती बाबत नियम तयार करुन दिले आहेत. या नियुक्त्यांसाठी व पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अटी व नियम परिशिष्ट 1 ते 13 मध्ये दिलेले आहेत.

1) सरळ सोप्रवेशासाठी सर्वसाधारण वयाची अट 33 वर्षे व मागासवर्गीयांसाठी 5 वर्षांनी शिथील केली आहे.तसेच प्रकल्पग्रस्त 3 वर्षे,स्वातंत्र्य सैनिकांची नामनिर्देशीत व्यक्ती 3 वर्षे अपंग व्यक्ती 45 वर्षापर्यंत वयोमर्यादा शिथीलक्षम आहे. अनुकंपा उमेदवार 40 वर्षे, ग्रा.प. कर्मचारी 45 वर्षे.
2) सरळ सेवा प्रवेशासाठी खालीलप्रमाणे राखी पदांचा कोठा निश्चित केलेला आहे.
   अनु.जाती-13, टक्के, अनु.जमाती-7 टक्के, विजा-3 टक्के, भज(ब)-2.5 टक्के, भ.ज (क)-3.5 टक्के, भ.ज (ड)-2 टक्के, विमाप्र-2 टक्के, इमाव-19 टक्के, खुला-48 टक्के.
3) राखीव पदावर इतर प्रवर्गातील उमेदवारांची नियुक्ती करता येत नाही. 5 वर्षापर्यंत भरती प्रयत्न करुनही त्या प्रवगात्ील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरचे पद इतर प्रवर्गातुन भरणेसाी शासन मान्यता घेऊनच भरावे लागते.
4) उमेदवाराचे किमान वय 18 वर्षापेक्षा कमी नसावे. व एकापेक्षा अधिकारी पती/पत्नी असता कामा नयेत.
5) अनु.जमाती उमेदवाराचे जाती प्रमाणपत्र, जातीचे पडताळणी समितीने तपासून योग्य प्रमाणपत्र दिल्याशिवाय त्यास नेमणुक देता येत नाही.
6) मंजुर पदाचे 5 टकके प्रकलपग्रस्ता /भुकंपग्रस्त असून अन्य समांतर आरक्षणातील पुढीलप्रमाणे एका भरती प्रसंगी रिक्त असणारे पदाच्या 30 टक्के महिला, 3 टक्के अपंग, 15 टक्के माजी सैनिक, खेळाडू 5 टक्के, ग्रा.प.कर्मचारी 10 टक्के यांना समांतर आरक्षण लागू असून त्याप्रमाणे उमेदवार निवडणे आवश्यक आहे.
7) वर्ग-3 पदासाठी जिल्हा निवड मंडळ व वर्ग 4 चे पदासाठी मु.का.अ यांचे अध्यक्षतेखालील निवड समितीची शिफारशीनुसार प्राप्त होणा-या निवड यादीतुन भरता येते.
8) वर्ग 3/4 भरतीसाठी वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणे व सेवा योजन कार्यालयाकडून उमेदवार याद्या मागविणेच्या सुचना आहेत.
9) शिक्षक संवर्ग वगळता अन्य संवर्गातील पदे भरतांना 75 गुणांची लेखी परिक्षा व 25 गुणांची मुलाखती घेवुन एकत्रित गुणांचे आधारे निवड यादी करणेच्या शासन सुचना आहेत.
10) 28 मार्च 2001 नंतर 2 पेक्षा जास्त अपत्ये हयात नसावीत.

**पदोन्नती**

1) नियमित पदोन्नतीसाठी कनिष्ठ पदावार किमान 3 वर्षे सेवा होणे आवश्यक असून वरिष्ठ पदाची पदोन्नती साखळी आवश्यक आहे.
2) सेवा जेष्ठतेनुसार ज्या त्या प्रवर्गातील रिक्त पदांसाठी त्या त्या प्रवर्गातील अमेदवाराचा पदोन्नतीसाठी विचार केला जातो.
3) पदोन्नतीसाठी 5 वर्षातील गोपनिय अहवाल शेरे सरासरी ब श्रेणी असणे आवश्यक आहे.
4) खाते निहाय चौकशी / पोलिस कारवाई असलेले किंवा निलंबित कर्मचारी यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येत नाही. अहवाल कालावधीत शिक्षा झाली नसली पाहिजे.
5) पदोन्नतीसाठी आवश्यक त्या अर्हता,परिक्षा, विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे अथवा उत्तीर्ण होणे पासुन सुट मिळणे आवश्यक आहे.

6) पदोन्नतीमध्ये 3  टक्के अपंग आरक्षण लागू आहे तर इमाव प्रवर्गासा आरक्षण नाही.

7) पदोन्नतीसाठी खालील प्रमाणे प्रवर्ग निहाय राखीव कोठा निश्चित करणेत आला आहे. सबरवाल निर्णयानुसार या निश्चित कोठयानुसार प्रवर्गनिहाय पदोन्नतीसाठी कर्मचारी भरती करणेच्या सुचना आहेत.

अनु.जाती-13 टक्के, अनु.जमाती-7 टक्के, विजा-3 टक्के, भज(ब)-2.5 टक्के, भ.ज (क)-3.5 टक्के, भ.ज (ड)-2 टक्के, विमाप्र-2 टक्के, खुला-67 टक्के.

वि.जा.(अ), भ.ज.(ब) (क) (ड) या प्रवर्गातील कर्मचारी पदोन्नतीस उपलब्ध नसलस अंतर्गत परिवर्तनाने त्यातील इतर प्रवर्गामधील कर्मचारी यांचा विचार करता येतो.

जिल्हा परिषदेमधील वर्ग 3 व 4 कर्मचा-यांना पदोन्नतीसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालील अधिकारी यांची समिती गठीत केली आहे.

| | |
|---|---|
| 1. मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| 2. उप मु.का.अ.(साप्रवि) | सदस्य |
| 3. मागासवर्गीय अधिकारी<br>(सद्या अंतर्गत लेखा परिक्षा अधिकारी) | सदस्य |
| 4. ज्या खात्याचा प्रस्ताव असेल त्या खात्याचे<br>खाते प्रमुख | सदस्य |

पदोन्नती निवड समितीची सभा सर्वसाधारपणे सप्टेंबर मध्ये घेवुन प्रतिक्षा यादीसह निवड यादी करणेच्या सुचना आहेत.